महाराष्ट्र कृषी सेवा, गट-अ मधील कृषी उपसंचालक व अधिक्षक कृषी अधिकारी आणि सामान्य राज्य सेवा गट-अ मधील प्रशासन अधिकारी व वरिष्ठ प्रशासन अधिकारी पदावर पदोन्नती देण्याकरीता पदोन्नती समिती स्थापन करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
कृषी विभाग
शासन निर्णय क्रमांकः आकृवि-२४२६/प्र.क्र.१६०/१५-अे

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय विस्तार, मुंबई ४०० ०३२
दिनांक :- १९ ऑगस्ट, २०२६

<u>संदर्भ</u> -कृषी व पदुम विभाग शासन निर्णय क्रमांकः आकृवि १२२२/प्र.क्र.६८/१५अे, दि.२८.०३.२०२२

<u>प्रस्तावना</u>

महाराष्ट्र कृषी सेवा, गट-अ मधील कृषी उपसंचालक व अधिक्षक कृषी अधिकारी आणि सामान्य राज्य सेवा, गट-अ मधील प्रशासन अधिकारी व वरिष्ठ प्रशासन अधिकारी पदावर पदोन्नती देण्याकरीता संदर्भाधीन शासन निर्णयान्वये पदोन्नती समितीची स्थापना करण्यात आलेली आहे. सदर पदोन्नती समितीतील श्री. आर. एस. नाईकवाडी, तत्का. कृषी संचालक (विस्तार व प्रशिक्षण), कृषी आयुक्तालय, पुणे हे मागासवर्गीयाचे प्रतिनिधी म्हणून कार्यरत होते. तथापि श्री. नाईकवाडी हे दि.३१/०७/२०२६ रोजी नियतवयोमानानुसार सेवा निवृत्त झालेले असल्याने विभागीय पदोन्नती समितीची पुनर्रचना करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय</u>

महाराष्ट्र कृषी सेवा, गट-अ मधील कृषी उपसंचालक व अधिक्षक कृषी अधिकारी आणि सामान्य राज्य सेवा, गट-अ मधील प्रशासन अधिकारी व वरिष्ठ प्रशासन अधिकारी पदावर पदोन्नती देण्याकरीता विभागीय पदोन्नती समितीची पुनर्रचना करून पुढीलप्रमाणे सुधारीत विभागीय पदोन्नती समिती गठीत करण्यात येत आहे :-

अ.क्र.	सदस्य	पद
१.	अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, कृषी विभाग मंत्रालय, मुंबई.	अध्यक्ष
२.	आयुक्त (कृषी), कृषी आयुक्तालय, पुणे	सदस्य
३.	सह/उप सचिव (आस्थापना), कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.	सदस्य
४.	कृषी सह संचालक (आस्थापना), कृषी आयुक्तालय, पुणे	सदस्य
५.	श्री.मिलिंद भदुजी शेंडे, कृषी सहसंचालक (नियोजन व अंदाजपत्रक), कृषी आयुक्तालय, पुणे	सदस्य तथा मागासवर्गीयांचे प्रतिनिधी
६.	वरिष्ठ प्रशासन अधिकारी, कृषी आयुक्तालय, पुणे.	सदस्य सचिव

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०८१९१५०३५१२७४६ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by SANTOSH SHALIGRAM PANZADE
Date: 2026.08.19 15:04:46 +05'30'

(संतोष पानझाडे)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मंत्री (कृषी) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
२. मा.मंत्री (फलोत्पादन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा.राज्यमंत्री (कृषी) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४. सचिव, कृषी विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. आयुक्त (कृषी), कृषी आयुक्तालय, पुणे.
६. उप सचिव (आस्थापना), कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. कृषी सह संचालक, (आस्थापना), कृषी आयुक्तालय, पुणे
८. श्री.मिलिंद भदुजी शेंडे, कृषी सहसंचालक (नियोजन व अंदाजपत्रक), कृषी आयुक्तालय, पुणे (व्दारा आयुक्त (कृषी) पुणे)
९. वरीष्ठ प्रशासन अधिकारी, कृषी आयुक्तालय, पुणे.
१०.निवड नस्ती/१५अे

******